# श्री. यादवराव केशवराव पराते

सेवक क्र. ४३४ मु.पो. मोहाडी, त. मोहाडी, जि. भंडारा

मी बारा वर्षाचा असताना मला नाकाचा फार त्रास होता. माझ्या नाकातून नेहमी थेंब-थेंब रक्त पडत असे. त्याकरिता वडिलांनी तुमसरला नेऊन डॉक्टरांना दाखविले. उपचार व्यवस्थित झाला नाही. म्हणून त्या डॉक्टरांनी भंडाऱ्याला जाण्यास सांगितले. भंडाऱ्याला गेल्यावर तेथे उपचार केला पण तेथेही यश आले नाही. शेवटी नागपूरला येऊन, मैडीकल कॉलेजमध्ये जाऊन नाकाच्या विशेषज्ञाकडे गेलो. मेडीकल कॉलेजमध्ये माझ्या नाकाचे दोन वेळा ऑपरेशन होऊनही आराम मिळाला नाही. नंतर मला प्लॅस्टिक सर्जरी विभागात पाठविण्यात आले. प्लॅस्टिक सर्जरी विभागातही डॉक्टरांनी दोन वेळा ऑपरेशन केले. याप्रमाणे मेडीकल कॉलेजमध्ये चार वर्षात चारदा ऑपरेशन्स झालीत. परंतु दुःख दूर झाले नाही. वडिलांनी माझ्याकरिता पाण्यासारखा पैसा खर्च केला पण काहीच फायदा झाला नाही. मेडीकल कॉलेजच्या डॉक्टरांनी यश न मिळाल्याने नागपूरला ऑपरेशन होऊ शकत नाही म्हणून सांगितले. हे ऐकून वडिलांचे धैर्य खचले. डॉक्टरांनी सांगितले की याच्या नाकात मासाचा गोळा आहे आणि तो काढण्याकरिता आमच्याकडे साधने नाहीत म्हणून तुम्ही याला मुंबईला घेऊन जावे. हे ऐकून वडिलांना काही सुचेनासे झाले.

नागपूरला राहणारे आमचे एक नातेवाईक श्री. रामाजी मौंदेकर हे एकदा मला भेटण्याकरिता आले. वडिलांची मनःस्थिती पाहून त्यांनी घडलेल्या गोष्टीबद्दल विचारपूस केली. वडिलांनी सविस्तरपणे हकीगत सांगितली. जेव्हा माणसाला काहीच सुचत नाही तेव्हा परमेश्वर कोणालातरी मदतीकरिता पाठवितो. परमेश्वरानेच श्री. रामाजी मौंदेकर यांना मदतीला पाठविले असे म्हणावे लागेल. त्यांनी वडिलांना समजाविले. आमच्या तत्त्वाचा उपासना करणाऱ्यांचे कॅन्सरसारखे असाध्य आजार परमेश्वरी कृपेने दुरुस्त झाले आहेत. तेव्हा तुम्ही घाबरण्याचे काहीच कारण नाही. त्यांच्या शब्दामुळे वडिलांना हिंमत आली. मुंबईला जाऊन इलाज करुनही काही फायदा झाला नाही तर तुम्ही काय कराल असे एक डॉक्टर म्हणाले. तुमसरच्या डॉक्टरांनी भंडाऱ्याला पाठविले. भंडाऱ्याच्या डॉक्टरांनी नागपूरला पाठविले आणि नागपूरच्या डॉक्टरांनी मुंबईला जाण्याबद्दल सांगितले. जर मुंबईला यश आले नाही तर ते अमेरिकेला जाण्यास सांगतील. तेव्हा तुम्ही जाऊ शकाल काय? त्या

डॉक्टरांचे विचार ऐकून वडिलांची बुध्दी पालटली व वडिलांनी भगवंताच्याच नावावर हे सर्व सोपवून हे तत्त्व स्वीकारण्याचे कबूल केले.

श्री.रामाजी मौंदेकर यांनी सांगितले की, ह्या तत्त्वावर अनेक देवांची पूजा बंद करुन जीवनात एकच भगवान मानावा लागतो. तसेच कुटुंबात सत्य, मर्यादा, प्रेमाने व एकतेने राहावे लागते. त्याचप्रमणो वडिलांनी घरातील सर्वांशी विचारविनिमय करुन व तत्त्व स्वीकारण्याबद्दल अनुमती मिळवली. त्यानंतर या तत्त्वावर आलो. ह्या तत्त्वावर येण्याकरिता आम्हास एकही पैसा खर्च आला नाही.

आमच्या कुटुंबात तत्त्व, शब्द व नियमांचे पालन झाले नाही. दोन कुटुंबाचे लोक एकत्र असल्यामुळे दोघांच्या विचारात फरक पडून एकतेत भंग झाला. त्यामुळे आम्हाला समाधान मिळाले नाही. तसेच आमच्या आवारात अनेक वर्षापासून म्हसोबा नावाचा दगडाचा देव असल्यामुळे घरातील व्यक्तींची भावना त्या ठिकाणी होती. त्यामुळे सुध्दा आम्हाला समाधान मिळत नव्हते.

एकदा उन्हाळ्यात बाबा आमच्या गावाला आले असतांना त्यांचा मुक्काम आमच्याकडेच होता. आम्ही आमची अडचण त्यांना सांगितली. तेव्हा बाबांनी ते ओळखले व म्हणाले, तुमची भावना समोर असलेल्या त्या म्हसोबाकडे जात असल्यामुळे तुम्हाला समाधान मिळाले नाही. तेव्हा बाबांच्या आदेशावरुन बाबांबरोबर आलेल्या सेवकांनी मिळून, त्या म्हसोबाच्या दगडाला तेथून काढून टाकले. तेव्हा शेजारी असलेल्या लोकांना ते पसंत पडले नाही. तेव्हा बाबा म्हणाले, ज्या लोकांना ह्या दगडाच्या देवाची पुजा करायची आहे. त्यांनी आपल्या घरी तो घेऊन जावा. तो दगड घेऊन जाण्यास कोणीच तयार नव्हते. तेव्हा तो दगड आम्ही आपल्या वाड्यात नेऊन कपडे धुण्याकरिता व आंघोळ करण्याकरिता उपयोगात आणला. त्यानंतर व्यसनी असलेल्या आमच्या भावाला वेगळे काढले. तेव्हापासून आम्हाला समाधान मिळण्यास सुरुवात झाली.

माझ्या नाकात जो मासाचा गोळा अनेक वर्षापासून होता व एक्सरे काढूनही दिसत नव्हता तो हळूहळू वाढायला लागला. व बाहेर येऊ लागला. मासाचा गोळा ही एक विकृती असून त्याला 'ट्यूमर ' असे म्हणतात. त्यामुळे नाकातील शिरांना उपाय होऊन पूर्वीपेक्षा अधिक सक्त वाहू लागले. नंतर तर रक्ताची धारच वाहू लागली. एकदा मी नागपूरला श्री. रामाजी मौंदेकरकडे आलो असताना माझ्या नाकातून रक्त वाहू लागले. दुसऱ्या दिवशी सकाळी महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या निवास्थानी जाऊन त्यांना सर्व हकीगत सांगितली. बाबांनी मला मेयो हॉस्पीटलमध्ये तपासण्याकरिता पाठविले. डॉक्टरांनी तपासल्यावर ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. डॉक्टरांचा निरोप मी बाबांना सांगितला. बाबांच्या आदेशाप्रमाणे घरी कोणलाही माहीत नसताना एका भगवंतावर विश्वास ठेवून ऑपरेशन करण्याकरिता दवाखान्यात भरती झालो.

मेयो हॉस्पीटलमध्ये माझे दोनवेळा ऑपरेशन झाले होते. त्या वेळी मला अनेक अडचणी आल्या. रक्त देण्याकरिता डॉक्टरांनी खूप त्रास दिला होता. तेव्हा बाबांनी मला सांगितले की, आपल्याला काहीच करावयाचे नाही परमेश्वर काय घडवतो हे पाहायचे आहे आणि खरोखरच परमेश्वराच्या कृपेने व बाबांच्या मार्गदर्शनाने डॉक्टरांनी मला स्वतःचे रक्त दिले. माझे ऑपरेशन सफल झाले. मला वाटले माझ्या नाकाचे ऑपरेशन डॉक्टरांच्या रुपाने परमेश्वराने केले कारण मेडीकल कॉलेजमधून परत आलेली केस लहान दवाखान्यात यशस्वी झाली. भगवंताच्या कृपेने मी आता पूर्ण बरा आहे. दोन्ही नाकपुड्यांतून मला व्यवस्थित श्वास घेता येतो. तेव्हापासून भगवंताच्या कृपेने व महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या मार्गदर्शनाने माझ्या कुटुंबात पूर्णपणे समाधान नांदत आहे. अशा कृपेला मी जीवनात टिकवून ठेवीन असे सत्य वचन देऊन माझे सत्य अनुभव पूर्ण करतो.

* * * * *